**नियमीत फौजदारी खटला क्र. ८१/२०२१**

MHNB030009032021

| | | |
|---|---|---|
| दाखल तारीख | : | २३-०३-२०२१ |
| नोंद तारीख | : | २३-०३-२०२१ |
| निकाल तारीख | : | ०१.०७.२०२६ |
| कालावधी | : | ०५ व. ०३ म. २९ दि. |

**२ रे अति. मुख्य न्यायदंडाधिकारी, नंदुरबार यांचे न्यायालयात**

**पिठासिन अधिकारी – श्रीमती अस्मिता. एस. वानखडे**

**नियमीत फौजदारी खटला क्र. ८१/२०२१** **निशाणी क्र.-** १५० /ब

महाराष्ट्र शासन, : **अभियोग पक्ष...**
मार्फत: उपनगर पोलीस स्टेशन, ता.
जि. नंदुरबार.

**विरुध्द**

१. दिलीप रोहिदास पटेल, :
वय : ६० वर्षे, धंदा :मजुरी

२. भगवान रोहिदास पटेल, :
वय : ६१ वर्षे, धंदा :मजुरी,

३. कैलास भगवान पटेल, :
वय : ३५ वर्षे, धंदा :मजुरी,

४. प्रफुल्ल भगवान पटेल, :
वय : ३३ वर्षे, धंदा : मजुरी,

५. रविंद्र सुभाष पटेल, :
वय : ४२ वर्षे, धंदा :मजुरी,

६. आनंद रतीलाल पटेल, :

वय : ३८ वर्षे, धंदा :मजुरी,

७. राजाराम मगण पटेल, :

वय : ६३ वर्षे, धंदा :मजुरी,

८. अशोक मगण पटेल, : **आरोपी...**

वय : ५९ वर्षे, धंदा :मजुरी,

आ.क्र. १ ते ६ रा. राकसवाडा, ता.

जि. नंदुरबार.

आरोपी क्र. ७ व ८ रा– शमशेरपुर

ता.जि.नंदुरबार.

---

श्री. आर. डी. बि–हाडे : सहा. सरकारी अभियोक्ता

श्री. एम.के.शेख : आरोपींतर्फे विधीज्ञ

---

## न्यायनिर्णय

(घोषित तारीख : ०१.०७.२०२६ )

**०१.** आरोपींविरुध्द प्रस्तुत प्रकरण भारतीय दंड विधान, १८६० (यापुढे संक्षेपाकरिता 'भा.दं.वि.' असा उल्लेख करण्यात येईल) चे कलम १४३, १४७,१४८,१४९,४५२, ३२४,५०४, ५०६ कलम प्रमाणे दोषारोप सिध्दतेकरिता दाखल आहे.

**०२.** अभियोग पक्षाचा थोडक्यात असे कथन आहे की, दि. ३०/११/२०२० रोजी संध्याकाळी ०७.०० वाजेच्या सुमारास फिर्यादी संगिता पदमसिंग राजपुत हिला माहीत झाले की, तिची मुलगी दिपीका हिला गावात रहाणारा चेतन उर्फ आकाश दिलीप पटेल

याने पळवुन नेऊन लग्न केले व ते दोघे उपनगर पो.स्टे. येथे आहेत. त्यांना त्याठिकाणी बोलविले असता फिर्यादी, तिचे पती, भाऊ धर्मराज असे त्याठिकाणी गेले. त्याठिकाणी त्यांनी त्यांच्या मुलीची मागणी केली असता त्यांनी परत दिली नाही. आरोपी क्र.१ याने त्यांना सांगितले की, "तुम्ही घरी चला, मुलगा व मुलगी यांना आम्ही रकासवाडा येथे घेऊन येतो. तेथे समाजाचे प्रतिष्ठीत लोकांना बसवुन आपण मोडुन घेऊ." त्यामुळे ते घरी परतले.

**०३.** संध्याकाळी ०९.०० वाजेच्या सुमारास आरोपी क्र.१ ते ८ हे सर्व शेजारीच रहात असल्याने फिर्यादीने त्यांना विचारणा केली की, "त्यांची मुलगी कुठे आहे तिला भेटु दया विचारपुस करु दया " परंतु त्यांनी फिर्यादीला भेटण्यास नकार दिला व भेटण्याचे विचारणा केल्याबाबत आरोपींना राग आला. तेव्हा आरोपी क्र. १ ते १० यांनी फिर्यादीच्या राहत्या घरात बळजबरी पुर्वक हातात लाठ्या काठ्या घेवुन घरात घुसले व ते घरातील हॉल मध्ये बसले असतांना आरोपी नं. १ व २ याने शिवीगाळ केली. आरोपी क्र. १ म्हणाला की, " तुमच्यानी जे होईल ते करुन घ्या, तुम्हाला तुमची मुलगी आम्ही परत देणार नाही त्याचे मुलाने लग्न केले आहे जरी तुम्ही मुलीची मागणी केली तर तुमचे पुर्ण खाणदानला आज जिवंत सोडणार नाही" अशी धमकी दिली तेव्हा आरोपी न. १ व २ रागात येवुन तिचे हात धरले आणि तिच्या कपडयाची हिशका बुचकी करुन ओढताण केली व आरोपी नं. १ याने त्याच्या हातात असलेल्या डेगांऱ्याने मारहाण करण्यास सुरूवात केली तेव्हा त्याला तिच्या दोन्ही हाताचा दंडावर मुक्कामार लागला असुन

त्याच्या कपाळावर व डोक्यावर डेगाऱ्याने मार लागुन कपाळावर रक्त निघु लागले व डोक्यावर मुकामार लागला. आरोपी नं. ३ ते ६ यांनी तिचे पती पदमसिंग यांना दोन्ही हातावर, पायावर ,पाठीवर मारहाण केली तसेच तिचा भाऊ धर्मराज यास आरोपी नं. ७ ते १० यांनी पायावर पाठीवर काठीने जबर मारहाण केली तेव्हा त्यांनी सर्वांनी जोराज ओरडाओरडा केली असता नारायण गुमानसिंग राजपुत, ओमकारसिंग सिंधुसिंग राजपुत, सुरेश रतनसिंग राजपुत, चंद्रसिंग भगतसिंग राजपुत, गोरख लखेसिंग राजपुत, भटु लोटनसिंग राजपुत यांनी त्याठिकाणी सदर लोकापासुन त्याचा बचाव करुन भांडणाची सोडवासोडव केली सदरील झालेला प्रकार हा त्यांनी पाहीला व ऐकला. ती सदर तक्रार देण्याकरीता पोलीस स्टेशनला येत असतांना दिलीप पटेल यांनी रोखुन धमकी दिली की, आमचे विरुध्द तक्रार दिली तर तुला व तुझा नवऱ्याला मारुन टाकु म्हणुन ती घाबरुन घरात बसली असता समाजातील लोकांची मदत घेवुन फिर्यादीने उपनगर, पोलीस स्टेशन नंदुरबार येथे फिर्याद दिली असता त्यांनी ती दाखल करुन घेतली नाही. त्यामुळे फिर्यादीने दिनांक ०८/१२/२०२० रोजी पोलीस अधीक्षक,नंदुरबार जिल्हा अधीक्षक कार्यालय, नंदुरबार यांचे कडे लेखी फिर्याद दिली परंतु त्यावर कोणत्याही प्रकारची दखल घेतली नाही त्यामुळे प्रस्तुतची फिर्याद न्यायालयात दाखल केली. सदर तक्रार अर्जावर फौजदारी प्रकिया संहिता कलम १५६ (३) प्रमाणे तपास करण्याचे आदेश न्यायालयाचे पुर्व अधिकारी यांनी दिनांक २०/१/२०२१ रोजी पारित केले.

**०४.** फिर्यादीच्या प्रस्तुत फिर्यादवरुन गुन्हा नं.११/२०२१ भा.द.वि कलम ३०७,३५२,३५४,१४३,१४७,१४८,३२४,५०४,५०६(२) सह कलम १४९ प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला. घटनेचा तपास पो.स.ई. प्रशांत जयसिंग राठोड, उपनगर पोलीस स्टेशन, नंदुरबार यांच्याकडे सूपुर्द करण्यात आला. तपासादरम्यान तपास अधिकारी यांनी घटनास्थळ व जप्ती पंचनामा तयार केला, जखमीचे वैद्यकीय प्रमाणपत्र हस्तगत केले, आरोपीस अटक केली आणि साक्षिदारांचे जबाब नोंदवून तपासाअंती न्यायालयात दोषारोप पत्र सादर केले.

**०५.** आरोपींविरुध्द भा.दं.वि. कलम १४३, १४७, १४८, ४५२, ३२४, ५०४, ५०६ सह कलम १४९ प्रमाणे दोषारोप (नि.क्र.४८) निश्चित केला. दोषारोपाचा मजकूर आरोपींला वाचून व समजावून सांगण्यात आला असता त्याने गुन्हा नाकबूल करुन संपरिक्षा चालविण्याची विनंती केली.

**०६.** आरोपींवरील आरोप सिध्द करण्याकरिता अभियोग पक्षातर्फे फिर्यादी साक्षीदार क्र.१ सुनिल प्रकाश कुलकर्णी निशाणी ६९, साक्षीदार क्र.२ पदमसिंग प्रतापसिंग राजपुत निशाणी ८५, साक्षीदार क्र.३ संगिता पदमसिंग राजपुत निशाणी १०३, साक्षीदार क्र.४ धर्मराज आनंदसिंग राजपुत निशाणी १०८, साक्षीदार क्र.५ चंद्रसिंग भगतसिंग राजपुत निशाणी १११, साक्षीदार क्र.६ तपासी अंमलदार प्रशांत जयसिंग राठोड निशाणी ११७ व साक्षीदार क्र.७ डॉ.विवेकानंद सदानंद वळवी निशाणी १२५ वर तपासण्यात आले. अभियोग पक्षाने तोंडी पुरावा व्यतिरिक्त कागदोपत्री पुरावा

म्हणुन फिर्याद निशाणी १०४, घटनास्थळ पंचनामा निशाणी ७०, वैद्यकिय प्रमाणपत्र निशाणी १२६ इत्यादी कागदपत्राचा आधार घेतला आहे.

०७. आरोपींचे फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम ३१३ अन्वये जबाब निशाणी क्र.१३५ ते १५१ प्रमाणे नोंदविण्यात आलेला आहे. आरोपींचा बचाव नकारात्मक स्वरुपाचा आहे.

०८. उभय पक्षांचे युक्तिवाद ऐकले. अभिलेखाची सखोल शहानिशा केली. न्यायनिर्णयासाठी उद्भवलेले मुद्दे त्यावरील निष्कर्ष व कारणमीमांसा खालीलप्रमाणे देत आहे.

| मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|
| १. दि.३०/११/२०२० रोजी रात्री ९.०० वाजता फिर्यादीच्या घरात राकसवाडा ता. जि. नंदुरबार येथे आरोपींनी गैरकायद्याची मंडळी जमवुन त्याचे सदस्य झाले. सदर बेकायदेशीर जमावाचे समान उदिष्ट फिर्यादी व साक्षीदार यांना दुखापत पोचविणे, शिवीगाळ करणे व धमकी देणे असे होते. आणि त्याद्वारे त्यांनी भारतीय दंड संहितेचे कलम १४३ अन्वये अपराध केल्याचे अभियोग पक्षाने सिध्द केले आहे काय? | **नकारार्थी.** |
| २. उपरोक्त तारखेस, वेळी व ठिकाणी आरोपींनी त्यांचे बेकायदेशीर जमावाचे समान उदिष्ट साध्य करण्याकरिता दंगा केला आणि त्याद्वारे त्यांनी भारतीय दंड संहितेचे कलम १४७ अन्वये अपराध केल्याचे अभियोग पक्षाने सिध्द केले आहे काय? | **नकारार्थी.** |
| ३. उपरोक्त तारखेस, वेळी व ठिकाणी आरोपींनी त्यांचे बेकायदेशीर | |

जमावाचे समान उदिष्ट साध्य करण्याकरिता शस्त्रास्त्रानिशी सज्ज होवुन दंगा केला आणि त्याद्वारे त्यांनी भारतीय दंड संहितेचे कलम १४८ अन्वये अपराध केल्याचे अभियोग पक्षाने सिध्द केले आहे काय?

४. उपरोक्त तारखेस, वेळी व ठिकाणी आरोपींनी त्यांचे बेकायदेशीर जमावाचे समान उदिष्ट साध्य करण्याकरिता फिर्यादीचे घरामध्ये फौजदारीपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने गृह अतिक्रमण केले आणि त्याद्वारे त्यांनी भारतीय दंड संहितेचे कलम १४८ अन्वये अपराध केल्याचे अभियोग पक्षाने सिध्द केले आहे काय?

५. उपरोक्त तारखेस, वेळी व ठिकाणी आरोपींनी त्यांचे बेकायदेशीर जमावाचे समान उदिदष्ट साध्य करण्याकरिता आरोपींनी फिर्यादी व साक्षीदारांना लाकडाने व लाकडी दंड्याने मारहाण करुन इच्छापुर्वक साध्या स्वरुपाची दुखापत पोहचविली आणि त्याद्वारे त्यांनी भारतीय दंड संहितेचे कलम ३२४ अन्वये अपराध केल्याचे अभियोग पक्षाने सिध्द केले आहे काय? ? **नकारार्थी.**

६. वर नमुद तारखेस, वेळी व ठिकाणी आरोपींनी त्यांच्या बेकायदेशीर जमावाचे सामाईक उदिष्ट साध्य करण्याकरिता फिर्यादी व साक्षीदार यांना शिवीगाळ केली आणि त्याद्वारे भारतीय दंड संहितचे कलम ५०४ सह कलम १४९ प्रमाणे अपराध केल्याचे अभियोग पक्षाने सिध्द केले आहे काय? **नकारार्थी.**

७. वर नमुद तारखेस, वेळी व ठिकाणी आरोपींनी त्यांच्या बेकायदेशीर जमावाचे सामाईक उदिष्ट साध्य करण्याकरिता फिर्यादीला व साक्षीदारांना जिवे मारण्याची धमकी दिली आणि त्याद्वारे भारतीय दंड संहितचे कलम ५०६ सह कलम १४९ प्रमाणे अपराध केल्याचे अभियोग पक्षाने सिध्द केले आहे काय ? **नकारार्थी.**

| | |
|---|---|
| ८. आदेश काय ? | **आरोपींना निर्दोष मुक्त करण्यात येत आहे.** |

## <u>कारणमीमांसा</u>

### <u>मुद्दे क्र.१ ते ८ करिता</u>

**०९.** उपरोक्त मुद्दे हे ऐकमेकांशी संबंधित असल्याने पुराव्याची पूनरावृत्ती टाळण्यासाठी ते एकत्रीतपणे चर्चेकरिता घेतले आहेत.

**१०.** साक्षीदार क्र.३ संगिता पदमसिंग राजपुत यांच्या पुराव्यात असे आले आहे की, घटना सन २०२० साली तिच्या घरी घडली. तिच्या मुलीला चेतन हा पळवुन घेऊन गेला होता व त्याने लग्न केले. आरोपी क्र.१ तिला म्हणाला की, घरी या मुलगी परत देतो. ती जेव्हा त्याच्या घरी मुलगी मागण्यास गेली त्यावेळी तो म्हणाला की, आम्ही मुलीला परत देणार नाही, तुमच्याने जे होईल ते करा. त्यानंतर फिर्यादी तिच्या घरी आली व सर्व आरोपी तिच्या घरी आले. त्यानंतर दिलीप व भगवान यांनी तिला डेंगाऱ्याने डोक्याला, कपाळाला व हाताला मारहाण केली. त्यामुळे तिच्या कपाळातुन रक्त निघत होते. त्याने तिच्या साळीची ओढताण केली. त्यानंतर चेतन दिलीप पटेल, जतीन दिलीप पटेल, प्रफुल्ल भगवान पटेल, कैलास भगवान पटेल, यांनी तिच्या पतीला हाताला व पाठीवर मारहाण केली. त्यानंतर राजाराम मगन पटेल, अशोक मगन पटेल, रविंद्र सुभाष पटेल, आनंद रतिलाल पटेल यांनी तिचा भाऊ धर्मराज याला काठीने पायाला व

हाताला मारहाण केली. त्यानंतर नारायण, ओंकार, सुरेश, चंद्रसिंग, गोरख व भट्टु असे त्याठिकाणी आले व त्यांनी भांडण सोडविले. आरोपी दिलीप म्हणाला की, तुम्ही जर फिर्याद दिली तर तुम्हाला मारुन टाकेल. त्यानंतर ती फिर्यादी देण्यासाठी पोलिस स्टेशनला गेली. पोलिसांनी फिर्याद घेतली नाही त्यामुळे तिने प्रस्तुतची फिर्याद नि.१०४ न्यायालयात दाखल केली.

**११.** फिर्यादीने तिचे पुराव्यामध्ये आरोपींना फिर्यादी व तिचे पती किंवा घरातील सदस्यांचा राग आला होता म्हणुन आरोपी तिचे घरी आले व तिला व तिचे पतीला मारहाण केली अश्या स्वरुपाचे तिचे काहीएक कथन नाही. आरोपी दिलीप याने हा तिच्या घरी येतांना त्याचे हातामध्ये डेंगारा किंवा लाठीकाठी घेऊन आला होता व दिलीप व भगवान यांचे प्रत्येकाच्या हातामध्ये डेंगारे होते असेही तिचे पुराव्यात कथन नाही. एका डेंगाऱ्याने दोन्ही आरोपींनी एकाच वेळी फिर्यादीला कशी मारहाण केली, सदर आरोपीने तिला डोक्यावर व कपाळावर कोणत्या बाजुने व कोणत्या हाताला मारहाण केली याबाबत तिच्या पुराव्यामध्ये स्पष्ट कथन नाही. तसेच तिचा विनयभंग करण्याच्या उद्देशाने आरोपीने तिची साळी ओढताण केली असे तिचे पुराव्यातील कथन नाही व कोणत्या आरोपीने तिच्या साळीचा कोणता भाग ओढताण केला याबाबत तिचे पुराव्यामध्ये स्पष्ट कथन नाही. आरोपी चेतन, जतीन, प्रफुल्ल व कैलास यांनी तिच्या पतीला हातावर व पाठीवर कश्याने मारहाण केली व नेमक्या कोणत्या हातावर व पाठीचा कोणत्या भागावर मारहाण केली याबाबत तिच्या पुराव्यात स्पष्ट कथन नाही. तसेच राजाराम, अशोक,

रविंद्र व आनंदा यांनी साक्षीदार धर्मराज याला मारहाण केल्यामुळे त्याला दुखापत झाली असे तिच्या पुराव्यात कथन नाही. तिच्या पतीला मारहाणीमुळे दुखापत झाली असेही तिचे कथन नाही. तसेच तिला सदर मारहाणीमुळे दुखापत झाली असे ती म्हणत नाही. मारहाणमुळे ती रक्त निघाले असे म्हणते परंतु मारहाणीमुळे तिला मार लागला व त्यामुळे रक्त निघत होते असे तिचे सपष्ट कथन नाही. तिचे पुराव्यामध्ये निश्चीत कोणत्या आरोपीने तिला कपाळावर मारहाण केली याबाबत स्पष्ट कथन नाही. फिर्यादीने तिचे उलटतपासात मारामारीची घटना अर्धा तास सुरु होती, तिचे कपड्यांवर रक्त लागले होते ते तिने पोलिसांना दिले नाही, ज्यादिवशी घटना घडली त्यावेळी ती उपचारासाठी दवाखान्यात गेली होती, इतर साक्षीदार सुध्दा उपचारासाठी गेले होते असे कथन करुन तिच्या मुलीला चेतन याने पळवुन नेल्यामुळे तिचा त्याच्यावर राग होता व तिचे पतीवर दिलीप याने फौजदारी केस दाखल केली त्यामध्ये अटक झाली होती त्याचा सुध्दा तिला राग होता हे मान्य केले आहे. प्रस्तुत प्रकरणात तपासी अंमलदार यांनी कोणतेही रक्त लागलेले कपडे व लाकडी डेंगारा जप्त केलेले नाही तसेच घटनेच्या दिवशी फिर्यादी व साक्षीदाराने घेतलेल्या वैद्यकीय उपचाराचे वैद्यकीय प्रमाणपत्र हस्तगत केलेले नाही. त्यामुळे अश्या परीस्थीतीत फिर्यादीची साक्ष अभियोग पक्षास आरोपीविरुध्द गुन्हा सिध्द होण्यासाठी पुरेसे वाटत नाही. त्यामुळे अभिलेखावरील उर्वरीत साक्षीदारांच्या पुराव्याचे अवलोकन करणे आवश्यक आहे.

**१२.** साक्षीदार क्र.१ सुनिल प्रकाश कुलकर्णी यांचे पुराव्यात असे आले आहे

की, दि.२३/०१/२०२३ रोजी त्याला पोलिसांनी राकसवाडा येथे बोलविले होते. पोलिसांनी तेथे पंचनामा केला. तो कशाचा केला ते त्याला आठवत नाही. त्यातील मजकुर त्याला आठवत नाही. सदर साक्षीदाराने अभियोग पक्षास मदत न केल्याने अभियोग पक्षाने न्यायालयाच्या परवाणगीने त्याचा उलटतपास घेतला. सदर उलटतपासात तो संगिताबाई यांचे घर क्र.४२ येथे पंचनाम्यासाठी गेला होता, संगिताबाई यांनी घटनास्थळ दाखविले व पोलिसांनी पंचनामा नि.७० केला याबाबी मान्य केल्या आहेत. सदर साक्षीदाराने त्याचा आरोपीच्या वकीलांनी घेतलेलया उलटतपासात त्याने अनेक केसेस मध्ये वरीष्ठांच्या आदेशावरुन पंच म्हणुन काम केले आहे, तो घटनास्थळावरच्या घरात गेला नव्हता, पोलिसांनी पंचनाम्यात जे काही लिहीले ते त्याला माहीत नाही हे स्पष्ट मान्य केले आहे. यावरुन सदर पंचनामा हा घटनास्थळावर सदर साक्षीदारासमक्ष झाला या बाबी विश्वासार्य वाटत नाही.

**१३.** साक्षीदार क्र.२ पदमसिंग प्रतापसिंग राजपुत यांचे पुराव्यात असे आले आहे की, दि.३०/११/२०२० रोजी त्याचे मुलीस चेतन पटेल हा घेऊन गेला होता, त्यामुळे भांडणे झाली. त्याच्या मुलीला पोलिस स्टेशनला आणले होते. त्याला सांगण्यात आले होते की, ९ वाजेपर्यंत मुलीला घरी पोचवु परंतु त्याप्रमाणे मुलीला आणले नाही. दिलीप पाटील याचे घर त्याचे शेजारी आहे तो तिथे गेला. त्याला व त्याच्या पत्नीला रोहीदास पटेल, दिलीप पटेल व इतर ९ अश्यांनी लाठीकाठीने मारहाण केली. दिलीप पटेल व भगवान पटेल यांनी त्याचे पत्नीस मारहाण करुन कपड्यांची ओढताण केली.

**१४.** सदर साक्षीदाराने त्याचे उलटतपास आरोपी हे पटेल समाजाचे व तो राजपुत समाजाचा आहेत व त्यामुळे त्याला लग्न मान्य नव्हते हे मान्य केले आहे. सदर साक्षीदाराची साक्ष की, तो व इतर साक्षीदार हे दिलीप पटेल यांचे घरी गेले ही फिर्यादीच्या पुराव्याशी सुसंगत नाही. कारण फिर्यादीने तिचे पुराव्यात सर्व आरोपी तिच्या घरी आले असे कथन केले आहे. सदर साक्षीदाराने घटना नेमकी कुठे घडली, तसेच कोणत्या आरोपीने त्याला व त्याच्या पत्नीला शरीराच्या कोणत्या भागावर मारहाण केली, एकाच लाठीने सर्वांनी एकाच वेळी दोघांना कशी मारहाण केली याबाबतचे कथन त्यांचे पुराव्यात नाही. आरोपींनी विनयभंग करण्याच्या उद्देशाने फिर्यादीचे कपड्यांची ओढताण केली असे कथन सदर साक्षीदाराने केलेले नाही. सदर साक्षीदाराचा पुरावा हा मोघम स्वरुपाचा असल्याने अभियोग पक्षाचा पुरावा आरोपी विरुध्द गुन्हा सिध्द होण्यासाठी पुरेसा ठरत नाही.

**१५.** साक्षीदार क्र.४ धनराज आनंदसिंग राजपुत यांच्या पुराव्यात असे आले आहे की, फिर्यादी त्याची बहीण आहे व आरोपी त्याचे गावचे आहेत. दि.३०/११/२०२० रोजी त्यादिवशी संध्याकाळी ०५.३० वाजता त्याचे जिजाजी पदमसिंग याचा फोन आला होता त्यावरुन तो पोलिस स्टेशनला गेला होता. त्याठिकाणी दिपीकाने सांगितले होते की तिने आकाश सोबत लग्न केले आहे व ती माहेरचे लोकांसोबत जाणार नाही. त्यावर दिलीप याने सांगितले की, तो मुलीला घरी घेऊन येईल व बसुन त्याबाबत चर्चा होईल. त्यानंतर सदर साक्षीदार पदमसिंग व संगिता

अश्यांनी दिलीप याचे घरी जाऊन विचारपुस केली त्यावेळी त्यांचे मध्ये बोलचाल झाली व ते घरी परत आले. त्यावेळी रात्री ०९.०० वाजता दिलीप पटेल, भगवान पटेल, कैलास पटेल, प्रफुल पटेल, आंनद पटेल, रविंद्र पटेल, राजाराम पटेल व अशोक पटेल असे लाठ्याकाठ्या घेऊन पदमसिंग याच्या घरी आले. दिलीप व भगवान यांनी संगिताबाई हिचे हात पकडले व तिच्या हाताच्या दंडावर काठ्यांनी मारहाण केली. तसेच संगिताबाई हिच्या डोक्यावर सुध्दा दांड्याने मारले. संगिताबाईने आरडाओरड केला असता त्याने व पदमसिंग अश्यांनी तिला सोडविण्याचा प्रयत्न केला. कैलास, प्रफुल, आनंद यांनी त्या दोघांना हाताबुक्यांनी व काठीने मारले. त्यांनतर गावातील लोक त्यांना सोडविण्यासाठी आले व सर्व आरोपी निघुन गेले. त्याचा न्यायालयामध्ये सुध्दा जबाब नि.१०९ नोंदविला होता. सदर साक्षीदाराने त्याला काठीने मारहाण केल्याबाबत त्याचे पुराव्यामध्ये वाढवुन सांगितले आहे. सदर साक्षीदाराची साक्ष ही घटना ही रात्री ०९.०० वाजता दि.३०/११/२०२० रोजी घडली ही फिर्यादीच्या पुराव्याशी सुसंगत नाही कारण फिर्यादीने घटना कोणत्या तारखेला व वेळी घडली याबाबत तिचे पुराव्यामध्ये तारिख व महिना सांगितलेला नाही. सदर साक्षीदाराची साक्ष की, दिलीप व भगवान यांनी फिर्यादी संगिता हिचे हात पकडले व फिर्यादी संगिताबाई हिने आरडाओरडा केला ही फिर्यादीचे पुराव्याशी सुसंगत नाही कारण तिने त्याबाबत तिचे पुराव्यात कथन केलेले नाही. सदर साक्षीदाराने त्याचे पुराव्यात दिलीप व भगवान यांनी तिचे हात पकडले असतांना तिच्या हाताच्या दंडावर व डोक्यावर नेमकी कोणी मारहाण केली याबाबत

त्याचे पुराव्यामध्ये स्पष्टता नाही. तसेच कैलास, प्रफुल व आनंद यांचेपैकी कोणाच्या हातामध्ये काठी होती व कोणी हाताबुक्यानी मारहाण केली याबाबत सुध्दा तिच्या पुराव्यात स्पष्टता नाही. सदर साक्षीदाराने त्याचे पुराव्यात सदर मारहाणीमुळे फिर्यादी व त्याला दुखापत झाली असे कथन केलेले नाही. त्यामुळे सदर साक्षीदाराची साक्ष अभियोग पक्षास आरोपीविरुध्द गुन्हा सिध्द विश्वासार्ह ठरत नाही.

**१६.** साक्षीदार क्र.५ चंद्रसिंग भगतसिंग राजपुत यांचे पुराव्यात असे आले आहे की, पदमसिंग याचे घरी घटना घडली होती. त्याच्या घरी भांडण झाली त्याचा आवाज आला होता त्यामुळे तो, नारायण, कुमानसिंग, गोरख लखेसिंग, ओंकार चिंधुसिंग, सुरेश रतनसिंग असे तिथे गेले. सर्व आरोपी लाठीकाठी घेऊन पदमसिंगच्या घरी गेले होत. पदमसिंग, त्यांची पत्नी संगिताबाई, त्याचा साला धर्मराज यांना आरोपींनी लाठ्याकाठ्यांनी मारहाण केली. संगिताबाई हिला दिलीप रोहीदास व भगवान रोहीदास यांनी डोक्याला व हाताला लाठ्याकाठ्यांनी मारहाण केली. धर्मराज व पदमसिंग याला प्रफुल पटेल, कैलास व अशोक यांनी लाठ्याकाठ्यांनी मारहाण केली. त्यानंतर पोलिस आले व लखमींना दवाखान्यात नेले. फिर्यादी पोलिस स्टेशनला जात होते त्यावेळी आरोपींनी तिला धमकी दिली की, तु जर पोलिस स्टेशनला गेली तर तुला जीवे ठार मारु.

**१७.** सदर साक्षीदाराने तयाचे पुराव्यामध्ये कोणत्या आरोपीने नेमके कोणाला व शरीराच्या कोणत्या भागावर मारहाण केली व सदर मारहाणीमुळे फिर्यादी व साक्षीदारांना

दुखापत झाली अश्या स्वरुपाचे त्याचे पुराव्यामध्ये स्पष्ट कथन नाही. सदर साक्षीदाराने त्याचे पुराव्यात घटनेच्या वेळी रात्र होती, त्यावेळी गावातील लोक आले होते, सदर घटनेमध्ये कोणाला दुखापत झाली होती याबाबत बरीच गर्दी जमल्यामुळे त्याला सांगता येत नाही, फिर्यादी ही घटनेच्या दुसऱ्या–तिसऱ्या दिवशी उपचारासाठी दवाखान्यात गेली होती, घटना सुरु असतांना पोलिस त्याठिकाणी आले व त्यांना पदमसिंगसह गाडीमध्ये घेऊन गेले हे मान्य केले आहे. यावरुन असे आढळते की, पोलीसांना सुध्दा सदर कथीत घटनेची खबर असल्याची आढळुन येते. परंतु घटनेच्या दिवशी कोणत्याही प्रकारचा गुन्हा आरोपी विरुध्द दाखल झाल्याचे अभिलेखावरुन आढळत नाही. सदर साक्षीदाराची साक्ष सुध्दा आरोपी विरुध्द गुन्हा सिध्दा होण्याकरीता विश्वासार्ह वाटत नाही.

१८. फिर्यादीने तिच्या पुराव्यामध्ये तिने घटनेबाबत पोलिस स्टेशनला कोणतीही फिर्याद दिली नाही हे स्पष्ट मान्य केले आहे. फिर्यादीने प्रस्तुतची फिर्याद न्यायालयात दाखल करण्यापुर्वी पोलीस स्टेशनला फिर्याद दिली होती याबाबतचा कोणताही कागदोपत्री पुरावा प्रस्तुत प्रकरणात दाखल केलेला नाही. फिर्यादीचे असे ही म्हणणे की, आरोपीने तिला व तिच्या परिवाला धमकी दिल्यामुळे तिने प्रस्तुतची फिर्याद पोलीस स्टेशनला दिली नव्हती. प्रस्तुतची फिर्याद ही घटनेच्या एक महिन्यानंतर उशीराने न्यायालयात दाखल केली आहे. तसेच साक्षीदार चंद्रसिंग याने कोणत्या आरोपीने फिर्यादीला धमकी दिली याबाबत स्पष्ट कथन केलेले नाही. त्यामुळे फिर्यादीचे म्हणणे की, आरोपी दिलीप पटेल यांनी फिर्यादीला धमकी दिली की, तुम्ही जर फिर्याद

दिली तर तुम्हाला मारुन टाकेल ही बाब सुध्दा विश्वासार्ह वाटत नाही.

१९. साक्षीदार क्र. ०७डॉ. विवेकानंद सदानंद वळवी यांचे पुराव्यात असे आले की, दि.०१/१२/२०२० रोजी ते शासकीय रुगणालय नंदुरबार येथे वैद्यकीय कार्यरत होते त्यादिवशी संगिताबाई पदमसिंग राजपुत ही तेथे आली तिने तिला दि.३०/११/२०२० रोजी रात्री ०९.०० वाजता मारहाण झाल्याबाबत सांगितले. त्यांनी तिला तपासले असता तिचे कपाळावर कापल्याची जखम ४*३ से.मी. आकाराची २४ तासाच्या आतील साध्या स्वरुपाची व खरचटल्याची जखम, ०.५ से.मी. २४ तासाच्या आतील साध्या स्वरुपाची झाल्याचे त्यांना आढळुन आले. सदर दोन्ही जखमा ह्या कठीण व बोथड वस्तुमुळे झाल्या होतया त्यामुळे त्यांनी वैद्यकीय प्रमाणपत्र नि.१२६ प्रमाणे दिले.

२०. सदर दोन्ही जखमा ह्या लाकडी काठीने मारहाण केल्यामुळे होऊ शकतात. सदर साक्षीदाराने त्याचे पुराव्यात व वैद्यकीय प्रमाणपत्र ह्यामध्ये कपाळाच्या कोणत्या बाजुने सदर जखमा झाल्या होत्या याबाबत कथन केलेले नाही. सदर साक्षीदाराने त्यांचे उलटपतासात सदर जखमा ह्या दि.०१/१२/२०२० रोजी झालेले असु शकतात, कापल्याची जखम ही रक्त निघणारी जखम नव्हती व जखम क्र.२ ही नखाने स्वतः हुन खरचटल्यामुळे होऊ शकते व लाकडी काठीने मारहाण केल्यास त्याचे व्रण शरीराच्या भागांवर उमटतात ह्या बाबी मान्य केल्या आहेत. वैद्यकीय प्रमाणपत्र नि.१२६ चे अवलोकन केले असता सदर प्रमाणपत्र हे दि.०१/१२/२०२० रोजीचे असुन त्यामध्ये

एमएलसी वेळ ही रात्री ०९.५५ मी.  अशी नमुद आहे. अभियोग पक्षाच्या कथनानुसार सदर घटना ही दि.३०/११/२०२० रोजी रात्री ०९.०० वाजेची आहे. सदर वैद्यकीय अधिकारी यांनी संगिताबाई ही हॉस्पीटलमध्ये घटनेच्या दिवशी आली होती असेही त्यांचे पुराव्यातील कथन नाही. फिर्यादीने घटनेची तारीख व वेळ तिच्या पुराव्यात सांगितलेली नाही. त्यामुळे सदर जखम ही २४ तासाच्या आतील असल्याबाबत सुध्दा विश्वासार्य वाटत नाही. सदर साक्षीदाराचे पुराव्यामध्ये वैद्यकीय प्रमाणपत्र सिध्द होत असले तरी त्यावरुन सदर जखम ही आरोपीनी दि.३०/११/२०२० रोजी मारहाण केलयामुळे झाल्याचे त्यावरुन सिध्द होत नाही.

**२१.** साक्षीदार क्र.६ तपासी अंमलदार प्रशांत जयसिंग राठोड यांचे पुराव्यात असे आले आहे की, प्रस्तुत प्रकरणातील गुन्ह्याचा तपास त्यांचेकडे देण्यात आला. त्यांनी फिर्यादीचे अवलोकन केल्यानंतर ते घटनास्थळी गेले. घटनास्थळ रकासवाडे गावात फिर्यादी यांचे घरात होते. त्यानंतर त्यांनी दोन पंचांसमक्ष पंचनामा नि.७० केला. फिर्यादीचा पुरवणी जबाब नोंदविला. साक्षीदारांचे जबाब नोंदविले. फिर्यादी व साक्षीदार यांचा फौ.प्र.सं.कलम १६४ चा जबाब नोंदविला. जखमीचे वैद्यकीय प्रमाणपत्र मिळणेकरीता पत्र नि.११८ दिले. तपासामध्ये भा.द.वि.कलम ३०७ व ३५४ कमी केल्याबाबतचे पत्र न्यायालयास दिले. त्यानंतर फिर्यादीच्या घराचा गाव नमुना ८ नि.११९ दाखल केला. तपासामध्ये आरोपींनी बेकारयदेशीर जमाव जमवुन फिर्यादी संगिता पदमसिंग राजपुत, तसेच तिचे पती दिलीप राजपुत यांना हाताबुक्यांनी मारहाण,

वाईट शिवीगाळ करुन जीवेठार मारण्याची धमकी फिर्यादीच्या घरात दिली असे निष्पन्न झाले.

२२. सदर साक्षीदाराने तयांचे उलटतपासात जतीन पटेल व चेतन पटेल हे दोन्ही व्यक्ती आरोपी असल्याचे निष्पन्न झाले नाही, फिर्यादी व साक्षीदाराने या दोघांची नावे खोटी नमुद केली आहेत, पदमसिंग याने त्याच्या पुराव्यामध्ये त्यांनी आरोपीविरुध्द फिर्याद रागाच्या भरात दिली असे नमुद केले आहे, आरोपी क्र.१ दिलीप याचा मुलगा व फिर्यादी संगिताबाईची मुलगी यांनी लग्न केले होते असे तपासात निष्पन्न झाले व ते दोघे पळुन गेल्यामुळे फिर्यादीच्या मनात आरोपीबद्दल राग होता या संपुर्ण बाबी स्पष्ट मान्य केल्या आहेत. तसेच त्यांनी त्यांचे उलटतपासात प्रस्तुत गुन्ह्यात आरोपींच्या ताब्यातुन कोणताही मुद्देमाल जप्त केलेला नाही, प्रस्तुत गुन्ह्यामध्ये काठी किंवा इतर कोणताही हत्याराचा वापर न झाल्यामुळे ते प्रसतुत प्रकरणात जप्त केलेले नाही हे मान्य केले आहे.

२३. प्रस्तुत प्रकरणात पोलिस साक्षीदार मनोज श्रावण सरदार, किरण अजुर्न वळवी व हर्षल माधवराव साळुंखे यांचे जबाबास अभियोग पक्षाने निशाणी देण्यास हरकत घेतली नव्हती त्यामुळे सदर साक्षीदारांच्या जबाबास नि.१३० ते १३२ देण्यात आली. सदर साक्षीदारांना अभियोग पक्षाने त्यांचे साक्षीदार म्हणुन तपासलेले नाही. तसेच आरोपींनी सुध्दा त्यांना साक्षीदार म्हणुन प्रस्तुत प्रकरणात तपासलेले नाही. त्यामुळे केवळ अभियोग पक्षाने सदर जबाबांना निशाणी देण्यास हरकत घेतली नाही म्हणुन सदर जबाब हे निर्विवादपणे सिध्द होत नाहीत. सदर साक्षीदार क्र. ६ हे घटनेचे प्रत्यक्ष

साक्षीदार नसुन ते तपासी अंमलदार आहेत. त्यांनी साक्ष ही अभिलेखापुरती मर्यादीत स्वरुपाची असलयाचे आढळत असुन आरोपी गुन्हा घडण्यास कसे कारणीभुत आहेत हे सिध्द होण्याइतपत विस्तृत स्वरुपाची नाहीत. त्यामुळे त्यांची साक्ष ही अभियोग पक्षास आरोपीविरुध्द गुन्हा सिध्द होण्यासाठी पुरेसी ठरत नाही.

**२४.** प्रस्तुत प्रकरणातील फिर्यादी व साक्षीदार यांची साक्ष ही मोघम स्वरुपाची फिर्यादीने रागाच्या भरात दिल्याचे आढळुन येते. फिर्यादी व साक्षीदारांना दिनांक ३०/११/२०२० रोजी वैद्यकिय अधिकारी यांनी तपासल्याबाबत व त्यांनी त्या दिवशी औषधोचार घेतल्याबाबत वैद्यकिय प्रमाणपत्र अभिलेखावर नाही. आरोपींनी कोणत्या भाषेत काय शिवीगाळ केली याबाबत फिर्यादी व साक्षीदारांनी त्याचे पुराव्यामध्ये काहीही कथन केलेले नाही. आरोपीच्या ताब्यातुन किंवा घटनास्थळावरुन कोणताही लाठ्या काठ्या जप्त करण्यात आलेला नाही तसेच मारहाणीमुळे रक्त लागलेले फिर्यादी किंवा साक्षीदाराचे कोणतेही कपडे प्रस्तुत प्रकरणामध्ये जप्त करण्यात आलेले नाही. एकंदरीत अभियोग पक्षाच्या पुराव्याचे अवलोकन केले असता असे आढळते की, अभियोग पक्ष उपलब्ध असलेल्या साक्षी पुराव्याच्या आधारे आरोपींनी गैरकायद्याची मंडळी जमवुन त्याचे सदस्य झाले, बेकायदेशीर जमावाचे समान उदिष्ट साध्य करण्याकरिता दंगा केला, फिर्यादी व साक्षीदारांना लाठया काठयांनी मारहाण करुन इच्छापुर्वक साध्या स्वरुपाची दुखापत पोहाचविली, फिर्यादीच्या घरात फौजदारी पात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने गृह अतिक्रम केले, शिवीगाळ केली व धमकी दिली हे भा.दं.वि. कलम १४३, १४७, १४८,

४५२, ३२४, ५०४, ५०६ सह कलम १४९ चे आवश्यक घटक सर्व शंकांच्या पलीकडे जाऊन सिध्द करण्यास अभियोग पक्ष सपशेल अपयशी ठरला आहे. सबब, उपलब्ध असलेल्या अगदी कमकुवत पुराव्याआधारे आरोपी हे निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहेत. सबब, मुद्दे क्र. १ ते ७ चे निष्कर्ष नकारार्थी नोंदवून मुद्दा क्र. ८ च्या उत्तरार्थ खालील आदेश पारीत करण्यात येत आहे :

:: **आदेश** ::

१) आरोपी क्र.१ दिलीप रोहीदास पटेल, आरोपी क्र.२ भगवान रोहिदास पटेल, आरोपी क्र.३ कैलास भगवान पटेल, आरोपी क्र.४ प्रफुल्ल भगवान पटेल, आरोपी क्र. ५ रविंद्र सुभाष पटेल, आरोपी क्र. ६ आनंद रतीलाल पटेल, आरोपी क्र. ७ राजाराम मगन पटेल, आरोपी क्र. ८ अशोक मगन पटेल, यांना भा.दं.वि. कलम १४३, १४७, १४८, ४५२, ३२४, ५०४, ५०६ सह कलम १४९ अन्वये खालील गुन्हा केल्याच्या आरोपांमधून फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २४८(१) अन्वये निर्दोष मुक्त करण्यात येत आहे.

२) आरोपींचा वैयक्तिक बंधपत्र व जामीन बंधपत्र रद्द करण्यात येत आहे.

३) आरोपींनी फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम ४३७–अ अन्वये रु. २५,०००/– चे बंधपत्र व जामीन मुचलका द्यावा.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by ASMITA SHRIDHARRAO WANKHADE
Date: 2026.07.01 17:42:46 +0530

दिनांक : ०१.०७.२०२६ (श्रीमती अस्मिता एस. वानखडे)

ठिकाण : नंदुरबार. २ रे अति. मुख्य न्यायदंडाधिकारी, नंदुरबार